आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १० ऑगस्ट २०२५

ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा, देशात नागपूर-पुणे ही सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत रेल्वे सुरु.

2. राज्यात सायबर तसंच आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढल्यामुळे नागरिकांनी सजग राहण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन.

3. नागपुरातील कोराडी मंदिर परिसरातील निर्माणाधीन प्रवेशद्वार कोसळल्याने 17 जण किरकोळरित्या जखमी; कोणतीही जीवितहानी नाही.

4. नाशिकमध्ये इगतपुरी इथं एका बेकायदेशीर कॉल सेंटर रॅकेटचा सीबीआयकडून पर्दाफाश, पाच जणांना अटक.

अजनी-पुणे/वंदे भारत रेल्वे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. या निमित्ताने नागपुर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक आठवर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. पंतप्रधानांनी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे आज बंगळूरच्या केएसआर रेल्वे स्थानकावर आयोजित कार्यक्रमातून नागपूर (अजनी)-पुणे गाडीला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. तसेच, याच कार्यक्रमात बेंगळुरू-बेळगाव आणि कटरा-अमृतसर वंदे भारत एक्सप्रेस या गाड्यांचाही शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णवही उपस्थित होते त्यांनी नागपूर-पुणे या रेल्वेचे महत्व अधोरेखित केल.

*Third is between Nagpur and Pune. These 2 are very large industrial and technological hubs and there is lot of demand for movement between Pune and Nagpur.*

अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी असून ८८१ किमी अंतर कापणारी ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत आहे. या एक्सप्रेस मुळे नागपूर ते पुणे हे अंतर जवळपास बारा तासात कापणे शक्य होणार असून यामुळे यापूर्वी लागणारा

प्रवासाचा अधिकचा वेळ वाचणार आहे अस प्रसार माध्यमांशी बोलतांना मुख्यमंत्रांनी सांगितलं

*नागपूर आणि पुण्याच्या प्रवाशांना याच्यामध्ये प्रवास करता येईल केवळ 12 तासांमध्ये हा प्रवास पूर्ण होणार आहे. नॉर्मली आपल्याला माहिती 16-17 तास त्या ठिकाणी लागतात म्हणून या वंदे भारत ट्रेन करता माननीय प्रधानमंत्री महोदयांचे आणि रेल्वेमंत्री महोदयांचे मी मनापासून आभार मानतो. आज त्यासोबत रेल्वेच्या अथॉरिटीशी मी चर्चा केलीआहे. आता नगरवरनं ट्रेन दौंडला जाते, दौंडवरनं पुण्याला जाते. एक प्रकारे 100- 125 किलोमीटर डीरूटीन केला जातो आणि म्हणून मी त्यांना असं सुचवलं आहे की नगरवरनं जर थेट पुण्यापर्यंत आपण लाइन केली, तर त्यातन आपले मोठ्या प्रमाणात वेळही वाचेल आणि डिस्टन्सही कमी होईल. आमचा प्रयत्न असाही आहे की आपण जो छत्रपती संभाजीनगरपासून पुण्यापर्यंत नवीन एक्स्प्रेस वे करतो आहे, त्याच्याच राइट ऑफ वेमध्ये आपल्याला जर ही रेल्वे करता आली, तर नागपूर पुणे डिस्टन्स रेल्वेचं 100 किलोमीटरपेक्षा आपल्याला कमी करता येईल.*

अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेस ही गाडी नागपूर ते पुणे प्रवासादरम्यान वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर आणि दौंड या स्थानकावर थांबून दौंड कॉर्डलाइन मार्गे पुण्याला पोहोचणार आहे.या रेल्वेला शेगाव इथंही थांबा देण्यात आला आहे, असं मध्य रेल्वेने आपल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलं आहे. आज या ट्रेनच्या ट्रायल रनमध्ये सहभागी झालेल्या प्रवाशांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

*मी आज वंदे भारत मध्ये नागपूर ते बडनेरा ट्रॅव्हल करत आहे आणि जस आता आमची ट्रेन स्टार्ट झाली आहे, याचा अनुभव चांगला आहे बाकी ट्रेन पेक्षा याचे स्टॉपेज आहे आणि बाकी ट्रेनपेक्षा जलद गती आणि फास्ट मध्ये दोन तास बिफोर बाकी ट्रेन पेक्षा आपल्याला पुण्याला पोहोचवणार.*

या प्रसंगी रेल्वेस्थानकाचा परिसर पुष्पहार, तोरण, पताका व फुलांनी सजवण्यात आला होता. मुख्यमंत्री आणि इतर उपस्थित अधिकाऱ्यांनी प्रवाशांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विद्यार्थी, प्रवासी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गरुड दृष्टी' सोशल मीडिया मॉनिटरिंग

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर, आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढत असल्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारांकडे सजगपणे बघावं, सावध राहावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूरमध्ये केलं. नागपूर पोलिसांनी विकसित केलेल्या गरुडदृष्टी समाजमाध्यम निगराणी प्रकल्पाचं सादरीकरण आणि आर्थिक फसवणूक झालेल्यांना त्यांची चोरलेली रक्कम परत देण्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते. नागरिकांनी फसवणूक झाल्यावर त्याची माहिती तातडीनं संबंधित यंत्रणांना द्यावी, जेणेकरून वेळीच योग्य ती कारवाई करून ही फसवणूक थांबवता येईल, असंही फडणवीस म्हणाले. देशातली सर्वात उत्तम सायबर गुन्हेगारीविरोधी यंत्रणा महाराष्ट्राकडे आहे, याचा उल्लेख त्यांनी केला. तसंच, गरुडदृष्टी प्रकल्पाद्वारे समाजमाध्यमावरच्या द्वेषपूर्ण, गुन्हेगारी पोस्ट्सवर कारवाई करण्यात आल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं. भविष्यात इतर पोलीस दलांनाही ही यंत्रणा देण्यात येईल आणि राज्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यात महत्त्वाची भूमिका ती बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 2025 मधील विविध सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये 200 पीडितांना त्यांच्या गमावलेल्या मालमत्तेची एकूण 10 कोटींची परतफेड मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हस्ते करण्यात आली.

तिरंगा रैली

केंद्र आणि  राज्य शासनाच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत  दक्षिण नागपूरच्या क्रीडा चौक इथल्या ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात नागरिकांच्या मनात राष्ट्रध्वजाप्रती अभिमान जागृत करण्यासाठी घेतलेल्या 'तिरंगा प्रतिज्ञा'ने झाली. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात हाती तिरंगा घेऊन स्वातंत्र्य सैनिक आणि वीर हुतात्म्यांना अभिवादन करणारा तिरंगा मेळा घेण्यात आला.  वाशिम जिल्ह्यातल्या पंचायत समिती कारंजा इथल्या शिवन बुद्रुक इथं काल हर घर तिरंगा हर घर स्वच्छता या मोहिमेंतर्गत रॅली निघाली. शालेय विद्यार्थ्यांनी यावेळी सार्वजनिक स्वच्छता मोहिम राबवली. राज्य शासनाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक विभाग तसंच जल आणि स्वच्छता विभागाच्या समन्वयाने हर घर तिरंगा हर घर स्वच्छता स्वतंत्रता ही जनजागृती मोहिम सुरु आहे त्या अंतर्गत ग्रामपंचायतीने ही मोहिम राबवली.

## कोराडी घटना

नागपुरातील कोराडी मंदिर परिसरातील निर्माणाधीन प्रवेशद्वार उशीरा रात्री कोसळल्याने या अपघातात 17 जण किरकोळरित्या जखमी झाले आहे, जखमींना विविध खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही अशी माहिती पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी दिली..

*कोरडी मंदिराच्या मागे जे महादेवाच  बांधकाम चालू होत तिथं ऑलरेडी NDRF  ची टीम आहे लोकल पोलीस ऑलरेडी इथं पोहोचले आहे, ऍम्ब्युलन्स आहेत, कुठल्याही प्रकारची कॅजुअल्टी आतापर्यंत रिपोर्ट झालेली नाही आहे.  तरी देखील काही शक्यता नाकारता येत नाही, म्हणून आपण आता पुढचं सर्व तिथे एक्सकॅविशन करून चेक करत आहोत. परंतु आतापर्यंत काही कुठलीही कॅज्युअलिटीची शक्यता इथे दिसत नाही.*

निर्माणाधीन प्रवेश द्वार कोसळल्याची माहिती नागपुर जिल्हा प्रशासनाला मिळताच NDRF चे पथक मदत करण्यासाठी तात्काळ घटनास्थळी पोहचून मदत कार्याला सुरुवात केली. ही घटना काल रात्री 9.30 चा दरम्यान घडली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हाधिकारी, पोलिस, MMRDA, सह कोराडी मंदिर प्रशासनाचे अधिकाऱ्यांनी घटनास्थळावर धाव घेतली. पालकमंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांनी  सुद्धा आज घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी बावनकुळे यांनी या घटनेत दोष कुणाचा आहे. याची चौकशी करण्याचे निर्देश दिले असून दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. कोराडी मंदिराजवळील मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम NMRDA च्या माध्यमातून होत आहे. या बांधकामाचा कोराडी मंदिर संस्थांनशी काही सबंध  नसल्याचे मंदीर प्रशासनाद्वारे कळविण्यात आले आहे.

## कॉल सेंटर रॅकेट

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं नाशिकमध्ये इगतपुरी इथं सुरु असलेल्या एका बेकायदेशीर कॉल सेंटर रॅकेटचा पर्दाफाश केला. या प्रकरणी सीबीआयनं मुंबईतल्या सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यातल्या पाच जणांना अटक केली आहे. **अॅ**मेझॉन या ई-कॉमर्स संकेतस्थळाचं ग्राहक मदत केंद्र असल्याचं भासवून या कॉल सेंटरवरुन ग्राहकांना फसवणूक करणारे फोन केले जात होते.गिफ्ट कार्ड तसंच क्रिप्टोकरन्सीच्या बाबतीतले फोनकॉल अमेरिका, कॅनडा आणि अन्य देशांच्या नागरिकांना करुन त्या माध्यमातून फसवणूक केली जात होती. आरोपींनी साठ जणांना या सेंटरवर कर्मचारी म्हणून नेमलं होतं.

सीबीआयने तपासादरम्यान ४४ लॅपटॉप आणि ७१ मोबाईल फोन जप्त केले. तसंच महागड्या गाड्या, सोनं आणि मोठ्या प्रमाणात रोकडही जप्त केली.

कालवा

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यातील रामदेगी परिसरात निमढेला तलावाला लागून असलेला चंदई कालवा काल रात्री फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले आहे. निमढेला तलावाचे पाणी चंदई कालव्याद्वारे 20 किलोमीटर पुढे जाते. तब्बल 6000 एकर भागातील शेती ओलीता खाली येते. या तलावाचे बांधकाम चाळीस वर्षांपूर्वी करण्यात आले असून शेतकऱ्यांनी प्रशासनाला वारंवार चंदई कालव्याची दुरवस्था अवगत केली. मात्र प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे रात्री अर्जुनी- झरी गावाजवळ वीस फूट लांब कालवा फुटला. या परिसरात पाऊस कमी पडल्यामुळे धान पिकावर संकट ओढवले आहे. त्यातच कालवा फुटल्याने धान पिकांना पाणी मिळणे कठीण झाले आहे. प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

महावितरण

मेळघाटातील अतिदुर्गम आणि आदिवासीबहुल वन क्षेत्रामधील महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा (चिखलदरा) उपकेंद्राला वन विभागाची अंतिम मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे जारीदा आणि परिसरातील ५० गावांना सुरळीत वीज पुरवठा मिळणार आहे. त्यामुळे विजेशी संबंधित समस्यांचे कायमस्वरूपी निराकरणही होणार आहे. जिल्हा विकास निधीतील आदिवासी उपयोजनेंतर्गत ९ कोटी ३३ लाख ९४ हजार खर्च करून जारीदा इथ नविन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात आले आहे.

हवामान

मागील दोन-तीन दिवसांपासून राज्यात पावसाने पुन्हा जोर धरला असून आजपासून त्याचा प्रभाव आणखी वाढणार आहे. संपुर्ण विदर्भात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तविली असून यलो अलर्ट जारी केला आहे. पुढील काही दिवस राज्यात पावसाचा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे, दरम्यान बुलडाणा जिल्ह्यातील चिखली आणि सिंदखेड राजा तालुक्यात पुन्हा काल रात्री अचानक आलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने पुर परिस्थिती निर्माण होऊन शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

*****